माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / १४ / २०२६ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
रणजित उल्हासराव ठाकूर	सहाय्यक महसुल अधिकारी, तहसिल कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे.	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे.

(सुनावणी दिनांक - ३० / ०९ / २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १०.११.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " प्रथम अपील निकाल होऊन देखील आदेशाची मुदतीत अंमलबजावणी केली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
१२.०८.२०२५	मौजे वाघोली येथील गट नं. ९४ मधील फेरफार नं. १७९७० बाबत दावा तक्रार क्र. SR/६६/२०२२ १. बारामती सह. बँक यांनी बोजा नोंद कमी करणेबाबत दिलेले पत्र. २. श्री. रणजित ठाकूर यांनी ७/१२ वर त्यांचे नावाची नोंद होणेबाबत केलेला अर्ज पोच. ३. श्री. कैलास काळे व रणजित ठाकूर यांचे अर्ज लेखी म्हणने यांची प्रत मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती दिली नाही."

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास माहिती / उत्तर दिले नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०७.१०.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. महसूल अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अभिलेखात उपलब्ध असणारी माहिती १५ दिवसात देण्यात यावी, असा निर्णय पारित केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर कार्यवाही केली नाही व प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यांची ही कृती अधिनियमातील कलम २० (१) नुसार दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार तहसिलदार, तहसिल कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे. यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असणारी व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार व्यक्तीश: विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२. तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक महसुल अधिकारी, तहसिल कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे. यांनी माहिती अर्जावर व प्रथम अपील आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचे विरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१) नुसार रु. १००००/- (अक्षरी - दहा हजार रुपये फक्त) शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये? याबाबतचा लेखी खुलासा दि. 02 / 22 / 2026 रोजी समक्ष उपस्थित राहून सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. १४ / २०२६ / पुणे 4493/2026 दिनांक - 14/10/2026